# डॉ. श्री. कुणाल खेमनार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे जिल्हा परिषद स्वनिधीत योजना सुचविण्यासाठी विविध

# सहभागधारकांना आवाहन

## सन 2017-18

---

भारत सरकार, महाराष्ट्र शासनाकडील विविध विभागाच्या महत्वाकांक्षी योजना, वित्त आयोग, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या कल्याणकारी व नाविन्यपुर्ण योजनांतर्गत विविध प्रकारचे लाभार्थी व सहभागधारक आहेत. ग्रामपंचायती, ग्रामपंचायतीअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी, महिला, किशोरवयीन मुली, गरोदर महिला, माता, नवजात बालक, शाळा कॉलेजमधील मुले-मुली, रस्ते, शेतकरी, जनावरे, इत्यादींचा सर्वांगिण ग्रामीण विकास व्हावा यास्तव जिल्हा परिषदेमार्फत विविध योजना स्वनिधीतुन राबविण्यात येतात.

सध्याच्या परिस्थितीमध्ये जिल्हा परिषदस्तरावर विविध विभागांतर्गत निर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांमधुन विषय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर विषय समितीमार्फत लाभार्थी निवड होऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. सदर लाभार्थी निवड करताना निकड, गरज, वास्तविकतेतील गरजु लाभार्थी यांचे प्रस्ताव ग्रामपंचायत व पंचायत समितीमधुन प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरावर निवड केली जाते. रस्त्यांच्या बाबतीत स्थानिक मागणी व आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध निधीतुन रस्त्यांची कामे करण्यात येतात. सर्व योजनांतर्गत लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर त्या लाभार्थ्याचे रोजगार स्वयंरोजगार व आर्थिक जीवनमान किती उंचावले याची माहिती उपलब्ध होणे महत्वाचे आहे. विकास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे योजनांची यशस्वी गाथा (Success Stories) ह्या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर टाकण्यात याव्यात.

ग्रामपंचायती, जिल्हा परिषदेचे रस्ते, ग्रामीण मार्ग, जिल्हा मार्ग, इतर मार्ग रस्ते, हे आमदार निधी, डोंगरी विकास कार्यक्रम, ग्रामीण रस्ते मजबुतीकरण योजना, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना या विविध योजनांतर्गत रस्त्यांची कामे करण्यात येतात. यामध्ये जिल्हा, ग्राम मार्गाला तसेच प्रत्येक रस्त्याला सांकेतांक क्रमांक ( कोडीफिकेशन ) देण्यात यावे. तसे करताना केंद्र शासनाने ग्रामपंचायतींना जो सांकेतांक क्रमांक दिलेला आहे त्या सांकेतांक क्रमांकाबरोबरच रस्त्याला क्रमांक देऊन कोडीफिकेशन करण्यात यावे. पाणी पुरवठा योजनांच्या सर्व माहितीचे उदा. हातपंप, विद्युत पंप, ग्रामीण पाणी पुरवठयाचे शाश्वत स्त्रोत व

स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी केलेल्या उपक्रमांची नोंदणी (कोडीफिकेशन) करण्यात यावी. त्याच प्रमाणे शेतकरी, विद्यार्थी, गरोदर माता, यांना आधार कार्ड ला जोडुन लाभ देण्यात यावेत. जेणेकरून योग्य त्या लाभार्थ्याला लाभ मिळेल. जनावरांच्या बाबतीतही जनावरांची पशुधन मोजणीद्वारे गावनिहाय सांकेतिक करून पशुधनाला योग्य ते लाभ देण्यात यावेत. जेणे करून कोणत्या ग्रामपंचायती अंतर्गत कोणत्या लाभार्थ्यांला कोणकोणते लाभ दिले आहेत व यामुळे त्याचे जीवनमान किती उंचावले आहे हे शासनास किंवा योजना राबविणाऱ्या विभागांना त्या योजनांची फलश्रुती कळेल. तसेच विविध योजना विकसीत करण्यासाठी याचा उपयोग होईल.

यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधुन कोणत्या योजना घ्याव्यात याबाबत ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर सर्व लाभार्थी, महिला, मुली, गरोदर व स्तनदा माता, नवजात बालक, शाळा-महाविद्यालयीन मुले व मुली, शेतकरी, समाज कल्याण व अपंग कल्याणासाठी योजना, पिण्याचे पाणी व स्वच्छता, शेती, पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय इत्यादीसाठी ग्रामीण स्तरावरून योजना सुचवून स्वनिधीमधून ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना सुचवाव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

Khemnar

डॉ. कुणाल खेमनार, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर